**मे. सहकारमहर्षि भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सर्व्हे नं. ८५, ९१ व ९२, अमृतनगर, पो. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर या कारखान्याच्या प्रस्तावित एकात्मिक साखर उद्योगाचे ५५०० ते ९००० टन / दिन व आसवनी / इथॅनॉल प्रकल्पाचे ४० ते ८० किलो ली. / दिन पर्यंत विस्तारीकरणाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत :**

..........................................................................................................................

मे. सहकारमहर्षि भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सर्व्हे नं. ८५, ९१ व ९२, अमृतनगर, पो. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर या कारखान्याच्या प्रस्तावित एकात्मिक साखर उद्योगाचे ५५०० ते ९००० टन / दिन व आसवनी / इथॅनॉल प्रकल्पाचा ४० ते ८० किलो ली. / दिन पर्यंत विस्तारीकरणाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली दि. २२ जूलै २०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता कारखाना स्थळी घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - ५४ / २०२१ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २१०७२० – एफटीएस – ००६६ दि. २०/०७/२०२१ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर | : | अध्यक्ष |
| २. | प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, नाशिक | : | सदस्य |
| ३. | प्र. उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, अहमदनगर | : | समन्वयक |

श्रीं. संजीव अ. रेदासनी, प्र. उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अहमदनगर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात खालीलप्रमाणे विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला होता, त्याअनुषंगाने सदर लोकसुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

सदर जाहीर लोकसनुावणी बाबतची जाहीर सुचना **दि. १९/०६/२०२१ रोजी दै. सकाळ (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी)** या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, अहमदनगर येथे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
- जिल्हा उदयोग केंद्र, अहमदनगर
- जिल्हा परिषद, अहमदनगर
- उप-विभगीय कार्यालय, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर
- तहसिल कार्यालय, संगमनेर
- संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

- ग्रामपंचायत कार्यालय सुकेवाडी, मालदाड, वेल्हाळे, घुलेवाडी, गुंजाळवाडी, ढोलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर.
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, अहमदनगर.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, नाशिक
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,(मुख्यालय), मुंबई
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर प्रकल्पा बाबत अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ अहमदनगर यांचेकडे कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात प्राप्त झालेली नाही. डॉ. व्ही. सुनंदा रेडडी, पर्यावरणतज्ञ यांचे प्रकल्पास पाठींबा देण्या बाबतचे पत्र प्राप्त झाले आहे. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर व अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांच्या मंजुरीने प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याची विनंती केली.

डॉ. हेमांगी नलावडे, प्रकल्पाचे प्रतिनिधी व पर्यावरण सल्लागार मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदय:स्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी नियोजित प्रकल्पाविषयी केलेल्या सादरीकरणा नंतर नागरिकांनी खालीलप्रमाणे सूचना / आक्षेप उपस्थित केले.

१. श्री. कुरे रामनाथ पुंडलिक. रा. गुंजाळवाडी :-
श्री. कुरे यांनी मुददा उपस्थित केला की, पाण्यापासुन होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाय योजना केली जाईल?
२. श्री. शरमाळे भास्कर, रा. समनापूर :-
श्री. शरमाळे यांनी मुददा उपस्थित केला की, हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी काय उपाययोजना केली जाईल?
३. श्री. नवगिरे विलास शंकर, रा. मालदाड
श्री. नवगिरे यांनी मुददा उपस्थित केला की, धुळीचे प्रदूषणातून कोणता कचरा बाहेर पडेल?
४. श्री. गुंजाळ विलास आबाजी. रा. गुंजाळवाडी
श्री. गुंजाळ यांनी मुददा उपस्थित केला की, स्पेंटवॉश, निर्माण होणारे सांडपाणी व घनकच-याचे व्यवस्थापन कसे करण्यात येईल?
५. श्री. आरगडे नवनाथ रा. गुंजाळवाडी
श्री. आरगडे यांनी मुददा उपस्थित केला की, दुषीत पाण्याची विल्हेवाट कशी लावली जाईल, प्रदूषित पाण्यामुळे कांही अडचणी निर्माण होतील काय?
६. श्री. सोनवणे गोरक्ष, रा. वेल्हाळे
श्री. सोनवणे यांनी मुददा उपस्थित केला की, प्रदूषित पाण्याचे स्त्रोत कोणते असतील?
७. सदस्य जाहीर लोक सुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी गुंजाळवाडी कारखान्याच्या वरच्या दिशेस (upstream) आहे की खालच्या दिशेस (downstream) आहे. प्रदूषणाचा कोणत्या गांवावर परिणाम होऊ शकतो ते ॲस्पेट लक्षात घ्यावेत. हवेच्या दिशे बाबत प्रेझेंटेशनमध्ये व ईआयएमध्ये तफावत असल्याचे नमुद केले, ऑनलाईन मॉनिटरींगचा मुददा उपस्थित केला इत्यादी बाबत रिपोर्टमध्ये नमूद करण्याचे सुचविले.

८. समन्वयक, लोक सुनावणी तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांनी बायो कंपोस्टींगचे सुरु राहणार आहे काय ? शुगरला सीपीयू दाखविलेला नाही फक्त डिस्टलरीला दाखविला आहे. तसेच शासनाच्या धोरणानुसार कोविडसाठी सीईआरची तरतुद बाबत मुददा उपस्थित केला.

मा. अध्यक्ष जाहीर लोक सुनावणी तथा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना उपस्थित प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी आदेशित केले त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधींनी खालीलप्रमाणे महिती दिली.

**जल प्रदूषण नियंत्रणाबाबत नमुद केले की,** जल प्रदूषणा बाबत दोन लोकांनी मुददा उपस्थित केला आहे. कारखान्याच्या प्रोसेसमधून जे सांडपाणी तयार होते त्यावर प्रक्रिया करण्यासाठी ६८० घ.मी. क्षमतेचा एफल्युएंट ट्रीटमेंट प्लॅन्ट उभारला आहे प्रस्तावित प्रकल्पामुळे त्याची क्षमता १००० घ.मी. पर्यंत वाढविली जाईल. आसवनीमधून जे प्रदूषित पाणी बाहेर पडते ते स्पेंट वॉश, स्पेंट लीज आणि कंडेंसेट असते. स्पेंटवॉश आणि स्पेंट लीज प्रक्रिया करुन परत प्रक्रियेमध्ये वापरले जाते. स्पेंटवॉश हा जास्त प्रदूषित स्त्रोत आहे. स्पेंटवॉशसाठी बायोगॅस, एमईई व इनसिनरेशन या वापर करण्यात येईल. कारखान्यात सध्या एमईई व बायो कम्पोस्टींग केले जाते. नविन प्रस्तावित आसवनीमध्ये नविन आधुनिक तंत्रज्ञान वापरणार आहोत. स्पेंट वॉशचे प्रमाण कमी केले जाईल. बाष्पीभवनातून जे पाणी होईल ते पाणी परत प्रक्रियेमध्ये वापरले जाईल त्यामुळे चांगल्या पाण्याची आवश्यकता कमी लागेल व घट्ट स्पेंटवॉशचा बायलरमध्ये इंधन म्हणून बगॅसबरोबर जाळणार आहोत.

साखर कारखान्याच्या ईटीपीमध्ये आपण जे पाणी ट्रीट करतो ते घातक प्रकारचे नसते, ते आपण इरिगेशनसाठी वापरतो त्यामुळे पाणी कारखान्याबाहेर पडणारच नाही याची व्यवस्था आपण करणार आहोत.

**हवा प्रदूषण नियंत्रणा संदर्भात नमुद केले की,** हवा प्रदूषण नियंत्रणासाठी सध्या इलेक्ट्रोस्टॅटिक प्रेसिपिटेटर व वेट स्क्रबर बसविलेले आहेत प्रस्तावित विस्तारिकरणात इलेक्ट्रोस्टॅटिक प्रेसिपिटेटर बसविण्याचे प्रस्तावित आहे, त्याची क्षमता ९९.९९ टक्के इतकी

असते त्यामध्ये ९९.९९ टक्के धुलीकरण ॲरेस्ट होतात, त्यामुळे फार कमी प्रमाणात धुलीकरण बाहेर पडतात.

**घनकचरा व्यवस्थापना संदर्भात नमूद केले की,** इस्ट स्लज कंपोस्टींगसाठी वापरतो आणि राख ही डायरेक्ट शेतातच वापरु शकतो त्यामुळे घनकच-यापासून कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही.

पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात जास्तीत जास्त व कमीत कमी काय होऊ शकते याचा आपण अभ्यास करतो. घुलेवाडी हे गांव साऊथ ईस्टला आहे. जर हवा प्रदुषण नियंत्रणासाठीचे काम इएसपीने बंद केले किंवा बगॅसमध्ये मॉईश्चर जास्त राहीला तर जास्त प्रमाणात धुलीकण बाहेर जाऊ शकतात तर त्याचा इफेक्ट होऊ शकतो, त्याकरीता पर्यायी व्यवस्था करणे कारखान्यावर बंधनकारक असणार आहे. साखर कारखान्याच्या बॉयलरला ऑनलाईन मॉनिटरींगची सुविधा उभारलेली आहे.

कारखान्याच्या प्रतिनिधीने सांगितले की, बायो कंपोस्टींगचे ऑपरेशन मध्ये राहील. शुगरला १२५० घ.मी. क्षमतेचा सीपीयू उभा केला आहे.

मा. अध्यक्ष जाहीर लोकसुनावणी अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर यांनी नमुद केले की, विस्तारीकरणा बाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले आहे. सदस्य जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी यांनी त्रुटी उपस्थित केल्या आहेत. प्रत्यक्ष सादरीकरण व ईआयए रिपोर्टमध्ये जी तपावत आहे ती दूर करावी आणि सदस्य जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे कारखान्यातील संबंधितांशी चर्चा करुन अपडेशन करण्यात यावे. या जन सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत मात्र पेरीफेरीतील गांव आहेत अशा सर्व गावांच्या ग्रामपंचायतींमध्ये या प्रकल्पाच्या विस्तारीकरणाची सर्व कागदपत्रे मराठीमध्ये प्रसिध्द करण्यात आली, जेणेकरुन त्या भागातील लोकांना या प्रकल्पाचे विस्तारीकरण नेमके काय होणार आहे याचा परिणाम येथील हवामानावर, पाणी व हवा यावर काय होणार आहे याचे पिक्चर त्यांना समजेल. कारखाना परिसरात हवा, जल प्रदूषण नियंत्रणाबाबत डिस्प्ले लावणे गरजेचे आहे. उपस्थित नागरिकांनी हवा, पाणी प्रदूषणा विषयी जे मुददे उपस्थित कले त्यावर कारखाना व्यवस्थापनाने तात्काळ उपाय योजना कराव्यात.

मा. अध्यक्ष जाहीर लोकसुनावणी अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर यांनी नमुद केले की, हा प्रकल्प विस्तार होत असतांना या परिसरातील शेतक-यांची आर्थीक क्षमता वाढणार आहे. आर्थीक सक्षमीकरण होत असतांना या भागातील पर्यावरणावर विपरित परिणाम होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे त्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना हाती घेण्यात याव्यात. या परिसरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणार आहे. कारखान्याने अधिकाधिक सीईआर निधी कोविड योजनांमध्ये खर्च करावा. कारखान्याने कोविड काळात मोठया प्रमाणात मदत केली त्याबददल आभार मानले. ज्यांनी शंका / आक्षेप उपस्थित केले आहेत त्यांना आश्वस्त करण्यात आले की, सदर सुनावणीचे व्हीडीओ चित्रीकरण करण्यात आले असून त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुददयांचा प्रोसेडींगमध्ये समावेश करण्यात येईल.

मा. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर यांनी सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **( संजीव अ. रेदासनी )** | **( डॉ.प्र.म.जोशी )** | **( संदीप निचित )** |
| समन्वयक तथा प्रउप्राअ | सदस्य तथा प्रा.अ. | अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, |
| मप्रनि मं. अहमदनगर | मप्रनि मं. औरंगाबाद | अहमदनगर |